
सकाळ १५.५.१.

# फुलपाडा धरण परिसरात बिबट्या ?

नालासोपारा, ता. १५ (बातमीदार) : विरार पूर्वेकडील फुलपाडा धरण परिसरात बिबट्या दिसल्याचा एक व्हिडीओ सध्या वसई, विरार, नालासोपारा परिसरात सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. या व्हिडीओने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र हा व्हिडीओ फुलपाडा धरण परिसरातीलच आहे किंवा नाही याची मात्र खातरजमा झालेली नाही. त्यामुळे नागरिकांनी हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करताना खातरजमा करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

व्हिडीओमध्ये दिसणारा बिबट्या एका सिमेंटच्या कठड्यावरून चालताना दिसत आहे. हा बिबट्या डरकाळी मारत पुढे पुढे शांत पणाने चालतानाही दिसत आहे, पण हा व्हिडीओ फुलपाडा परिसरातील आहे याची खातरजमा झालेली नाही. तरीही आजूबाजूला डोंगर, दाट जंगल आणि बाजूला वस्ती असल्याने नागरिकांत एक भीतीचे वातावरण पसरले आहे. पण नागरिकांनी घाबरून जाऊ नये, विनाकारण व्हिडीओ व्हायरल करून भीती पसरवू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



नालासोपारा : 'विरार फुलपाडा धरण परिसरात बिबट्याचे दर्शन' या नावाने व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमधील चित्र.

बिबट्याचा जो व्हायरल व्हिडीओ आहे तो खूप जुना व्हिडीओ आहे. सध्या अशी काही घटना घडली आहे, याची आमच्याकडे तरी याबाबत कोणती माहिती आलेली नाही.

- राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, विरार पोलिस ठाणे

लोकमत ५-५-१९.

# मीरा-भाईंदरमध्ये नवीन रस्ते बनवा, खोदा व पुन्हा बनवा!

**धीरज परब**

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईदर शहरात पालिका आणि तत्कालीन नगरसेवकांच्या भोंगळपणामुळे रस्ते बनवा, खोदा व पुन्हा बनवा असा एककलमी कार्यक्रम सुरु आहे. त्यामुळे चांगले बनविलेले रस्तेही खोदकामामुळे ओबडधोबड व खड्डेमय झाले आहेत.

शहरातील मुख्य रस्ते कधी वीज कंपन्या तर कधी गॅस कंपन्या अथवा दूरध्वनी - इंटरनेट आदी केबल टाकणारे खोदत आहेत. महापालिका देखील जलवाहिनी, भूमिगत गटार वा अन्य कारणांनी रस्ते खोदतच असते. अगदी नव्याने बनवलेले डांबरी रस्ते देखील कोणत्या ना कोणत्या कारणांनी खोदले जातात. रस्ते खोदल्याने चांगला बनवलेला रस्ता ओबडधोबड होतो. त्यावर सातत्याने खड्डे पडतात. खोदकाम करताना संबंधित विभागांशी योग्य नियोजन व समन्वय नसल्याने जलवाहिन्या, वीज केबल, गॅस पाईप, दूरध्वनीच्या केबल तुटतात. त्यामुळे कधी पाणी तर कधी वीज खंडित होते. गॅस पुरवठा बंद झाल्याने घरात चूल देखील पेटत नाही. रस्ता खोदल्याने वाहतूक कोंडीही पाचवीलाच पूजल्यासारखी आहे.




मेट्रोच्या कामामुळे मुख्य रस्त्यावर जागोजागी वाहतूक कोंडी होत आहे. शहरातील रस्ते आधीच फेरीवाल्यांसह बेकायदा पार्किंग, टपऱ्या, गाड्या, बाकडे आदी प्रकारच्या अतिक्रमणांच्या विळख्यात आहे.

पालिकेने काही रस्ते काँक्रीट बनविताना केबल, पाईप, जलवाहिन्यांसाठी वेगळे मार्ग तयार केले आहेत. त्याला चेम्बर दिले आहेत.

उर्वरित रस्ते काँक्रीटचे बनवण्याचे प्रस्तावित असल्याने केबल, पाइपलाइन आदींना पर्यायी भूमिगत मार्गिका व चेम्बर दिले जातील. या कारणांनी रस्ते खोदणे बंद होणार असल्याचे पालिकेचे म्हणणे आहे.

भाईंदर पश्चिमेच्या मुख्य छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर सध्या महानगर गॅसचे खोदकाम सुरु आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला खोदकाम केल्याने आधीच अरुंद व वर्दळीच्या रस्त्यावर चालणेदेखील अवघड झाले आहे. तशीच स्थिती रामदेव पार्क भागातील काँक्रीट रस्त्याच्या कामादरम्यान झाली आहे. अर्धा रस्ता खोदल्याने उर्वरित रस्त्यातून वाहने जाणे अवघड झाले आहे. त्यामुळे येथून प्रवास नकोसा झाला आहे.

सकाळ १५-१-१०

# मुक्या जीवांच्या रक्षणासाठी जैन अलर्टचे युवक सज्ज; दहा कबूतरांचे वाचवले प्राण

भाईंदर, ता. १५ (बातमीदार) : मकर संक्रांतीनिमित्त दोन दिवस आकाशात रंगीबेरंगी पतंगांची दाटीवाटी होते. यानिमित्त पतंग कापण्याची स्पर्धा रंगते. यात लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांचेच मनोरंजन होत असले तरी आकाशात भरारी घेणाऱ्या मुक्या जीवांसाठी या पतंगांचा मांजा मात्र जीवघेणा ठरत आहे. मांज्याने जखमी होणाऱ्या पक्ष्यांचे जीव वाचविण्यासाठी भाईंदर पश्चिम येथील जैन अलर्ट ग्रुप ही तरुणांची संस्था सध्या सज्ज झाली आहे. गेल्या दोन दिवसांत जखमी झालेल्या दहा कबुतरांचे प्राण संस्थेच्या कार्यकर्त्यांनी वाचवले आहेत.

संक्रांतीच्या काळात जखमी होणाऱ्या पक्ष्यांचे प्राण वाचविण्याचे काम जैन अलर्ट ग्रुप गेल्या चौदा वर्षांपासून करत आहे. संक्रांतीच्या आधीपासूनच पतंग उडविण्यास सुरुवात होते. पतंगांचा मांजा सहजासहजी दिसत नसल्यामुळे पक्षी आणि विशेषकरून कबुतर या मांज्यात फसतात. काहींच्या पंखाला जखम होते, तर काहींच्या मानेला. या पक्ष्यांवर वेळीच उपचार झाले नाही तर त्यांचा जीवही जातो. त्यामुळे दोन दिवस अगोदरपासूनच 'जैन अलर्ट'कडून जखमी पक्ष्यांवर उपचार करण्यासाठी शिबिराचे आयोजन केले जाते. यंदाही भाईंदर पश्चिम येथील बावन जिनालय परिसरात हे शिबिर शनिवारपासून सुरू झाले आहे.

शनिवारी आणि रविवारी मांजामुळे जखमी झालेली १५ कबुतरे शिबिरात आणण्यात आली. तेथे डॉक्टरांनी तातडीने त्यांच्यावर उपचार केल्यामुळे त्यातील १० कबुतरांचे प्राण वाचले. तर जास्त जखमी पक्ष्यांना भाईंदरमध्ये असलेल्या अहिंसा चॅरिटेबल ट्रस्टच्या उपचार केंद्रात पाठवण्यात येणार आहे. संस्थेने यासाठी हेल्पलाईन क्रमांकही जारी केला आहे. कोणालाही जखमी पक्षी अथवा कबुतर आढळून आले तर ८२८६८६२८७६ व ८२८६८६४८७६ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेने केले आहे.

सकाळ १५-१-१०

# सोनाराला लुटणाऱ्या चोरट्यांना अटक

नालासोपारा, ता. १५ (बातमीदार) : सोने खरेदी करण्याच्या बहाण्याने हातचलाखी करून सोने चोरी करून फरारी होणाऱ्या सराईत चोरट्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाने ही कामगिरी केली आहे. या अटक आरोपीमध्ये एक महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे.

राजेश सायबनणा कुडूनूर (३२) आणि छाया विनोद चव्हाण (४५) असे अटक केलेल्या आरोपींची नाव आहेत. विरार पूर्व फुलपाडा परिसरातील जीवन अपार्टमेंटमधील धर्मराज ज्वेलर्स दुकानांमध्ये गिऱ्हाईक म्हणून येऊन त्यांनी दुकानातून सात ग्रॅम २०० मिली वजनाचे सोन्याचे दागिने घेऊन फरारी झाले होते. याबाबत पृथ्वीराज राजपूत यांनी विरार पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी पोलिस आयुक्तालय गुन्हे शाखेचे प्रभारी पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे शाखा आणि विरार पोलिस यांच्याकडून तपास सुरू केला. गुन्हे शाखेच्या पथकाने नऊ दिवस आरोपींचा शोध घेतला. त्यानंतर घोडबंदर गावातील सिलमेटिक कंपनीत सापळा रचून राजेश सायबनणा कुडूनूर याला ताब्यात घेतले तर अंबरनाथ रेल्वे स्टेशनजवळून छाया चव्हाण या महिलेला ताब्यात घेऊन चौकशी केली. तेव्हा त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली.

## दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

आरोपींकडून गुन्हा करतेवेळी वापरलेली इको कार, मोबाईल व रोख रक्कम असा दोन लाख सहा हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल ही पोलिसांनी जप्त केला आहे. यातील राजेश या आरोपीवर विरार, तुळिंज, माणिकपूर, वालीव, अंबरनाथ या पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल असून, कासारवडवली आणि अंबरनाथ या पोलिस ठाण्यात हे फरारी म्हणून ही पोलिसांना पाहिजे आहेत.

CamScanner

म. टा. पु. पा-१०

# अनधिकृत शाळांचे वर्ग सुरूच

## १४३पैकी ११६ शाळा मान्यतेशिवाय चालू

**नरेंद्र पाटील**, पालघर

पालघर जिल्ह्यात एकूण १४३ शाळा अनधिकृत असून त्यापैकी १६ शाळा तपासणीअंती बंद करण्यात आल्या आहेत, तर ११ शाळांना मान्यता देण्यात आली आहे. मात्र उर्वरित ११६ शाळा अजूनही कोणत्याही मान्यतेविना सुरूच असल्याची धक्कादायक आकडेवारी

- विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह
- १६ शाळा कारवाईनंतर बंद

शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीतून नुकतीच समोर आली आहे. २०१८ ते २०२२ दरम्यान एकूण २२ शाळांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र तरीही अनेक शाळा राजरोस चालवल्या जात असल्याने, त्यामधील विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेवेळी या शाळांमधील विद्यार्थ्यांची जिल्ह्यातील अन्य अधिकृत शाळांमध्ये नोंदणी केल्याचे दाखवून परीक्षेला बसवण्यात येत असते. या पार्श्वभूमीवर, सरकारने एक तर या शाळाचालकांवर कडक कारवाई करावी अन्यथा या शाळांना परवानगी देऊन त्या अधिकृत कराव्यात, त्यामुळे विद्यार्थी व पालकांचा ताण दूर होऊन विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा मार्ग सुखकर होईल, अशी मागणी अनधिकृत शाळांच्या संस्थाचालकांनी केली आहे.

जिल्ह्यातील अनधिकृत शाळांची यादी जाहीर करून या शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये, असे आवाहन करण्यापलिकडे कोणतीही कारवाई जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून केली जात नाही. पालघर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागांतर्गत आठ तालुक्यातील ११८




| | माध्यमिक शाळा | प्राथमिक शाळा | एकूण शाळा |
|---|---|---|---|
| एकूण | ५९ | ८४ | १४३ |
| बंद केलेल्या शाळा | ४ | १२ | १६ |
| मान्यता मिळालेल्या शाळा | ६ | ५ | ११ |
| अजूनही सुरू असलेल्या शाळा | ४९ | ६७ | ११६ |

शाळांवर एक लाख रुपयांचा दंड आकारण्याची कारवाई २०१८मध्ये सुरू करण्यात आली होती. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९मधील कलम १८चा भंग या शाळांनी केल्याने पोट कलम ५ अन्वये एक लाखांच्या दंडाची वसुली करणे आणि शाळा बंद केल्यास प्रत्येक दिवशी दहा हजाराचा दंड आकारण्याचे आदेश तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद बोरीकर यांनी शिक्षण विभागाला २० ऑक्टोबर २०१८ रोजी दिले होते. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने २०१९ साली १९० शाळा अनधिकृत घोषित केल्या. मात्र त्यावेळीदेखील त्यांच्यावर कारवाईचे धाडस दाखविले नाही. आता यातील काही शाळा बंद पडल्या असून काहींनी मंजुरी मिळवल्याने अशा अनधिकृत शाळांची संख्या १४३ झाली आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनीही अनधिकृत शाळांना दंडाबाबत आदेश दिले होते.

### अनधिकृत शाळांची तालुकावार आकडेवारी

| एकूण | १४३ |
|---|---|
| वसई १२७ | |
| पालघर | ९ |
| वाडा | ३ |
| विक्रमगड | २ |
| डहाणू | १ |
| जव्हार | १ |

मात्र त्याबाबत शिक्षण सचिवांकडे काही वर्षांपूर्वी मागितलेले मार्गदर्शन न मिळाल्याने, यात सरकारचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. या अनधिकृत शाळांच्या प्रवेशद्वारांवर 'पालकांनी या शाळेत आपल्या पाल्याला प्रवेश घेऊ नये' असे बॅनर लावण्यापलिकडे मागील अनेक वर्षांपासून आजपर्यंत काहीही कारवाई झालेली नाही, याकडेही शिक्षण क्षेत्रातील धुरिणांनी लक्ष वेधले आहे.

लोकमत

# रक्ताच्या नात्यालाही अखेरचे दर्शन घ्यावे असे का वाटले नाही?

## भिकारी, अनोळखी मृतदेहांसाठी सापडत नाहीत चार खांदेकरी

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : जिवंतपणी अनेकांना आपलीच माणसे दूर करतात. मृत्यूनंतरही त्यांना निरोप देण्यासाठी चार खांदेकरी मिळू शकत नाहीत. वसईत वर्षभरात ८३ जणांच्या नशिबी असे मरण आले. त्यामुळेच रक्ताच्या नात्यालाही त्यांचे अखेरचे दर्शन घ्यावे, असे का वाटले नाही ? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

मृत्यूनंतर कोणीही न आल्याने सामाजिक संस्थांच्या मदतीने वसईतील स्थानिक पोलिसच त्यांचे आप्तस्वकीय झाले अन् त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले. आर्थिक परिस्थिती बेताची असलेलेच रुग्ण उपचारासाठी मनपाचे रुग्णालय गाठतात. अनेकवेळा घरी रुग्णाची ब्याद नको म्हणून त्यांना रुग्णालयात उपचारासाठी आणून सोडले जाते. अशा रुग्णांच्या मृत्यूनंतर त्यांचे नातेवाईक गावाकडे मृतदेह नेण्यास पैसे नसल्यास मृतदेह सोडून पोबारा करतात. बऱ्याचदा ग्रामीण भागातून आलेल्या रुग्णांच्या केसपेपरवरील पत्ता अपूर्ण असल्याने त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेणेही अवघड होते.

### कोणत्या महिन्यात किती अनोळखी मृतदेह आढळले

| महिना | अनोळखी मृतदेह |
|---|---|
| जानेवारी | ५ |
| फेब्रुवारी | ४ |
| मार्च | ७ |
| एप्रिल | ८ |
| मे | ७ |
| जून | ३ |
| जुलै | ५ |
| ऑगस्ट | ९ |
| सप्टेंबर | १२ |
| ऑक्टोबर | ८ |
| नोव्हेंबर | १० |
| डिसेंबर | ५ |

### रुळावरही सापडतात मृतदेह

मिरा रोड ते वैतरणा या वसई पोलिस ठाण्याच्या हद्दीतही रेल्वे अपघातात मृत्यू झालेले अनोळखी मृतदेह सापडतात. ओळख पटवण्यासाठी तेही सात ते आठ दिवस प्रयत्न करतात. मृतदेहाचे नातेवाईक आले नाही तर रेल्वे पोलिसही स्वतःच्या पैशाने त्यांचे अंत्यसंस्कार करतात.



### रक्ताच्या नात्यासाठी ८-१० दिवस वेटिंग

- अनोळखी मृतदेह सापडल्यावर त्यांचा मृतदेह कोल्डस्टोरेजमध्ये ठेवण्यात येतो. अकस्मात मृत्यूची नोंद करून पोलिस आजूबाजूच्या पोलिस ठाण्यात फोटो आणि माहिती ओळख पटवण्यासाठी पाठवतात.
- जर ओळख पटली नाही किंवा नातेवाईक आले नाही तर आठ ते दहा दिवस वाट पाहतात. तरीही नाही आल्यावर पोलिसच त्या मृतदेहावर स्वतःच्या खर्चाने अंत्यसंस्कार करतात.

### अंत्यसंस्काराचा खर्च कोण करणार?

- अनोळखी मृतदेह भेटल्यावर आठ ते दहा दिवस ठेवण्यात येतो; पण कोणीही नातेवाईक आला नाही तर त्या मृतदेहावर अंत्यसंस्कार पोलिसच करतात व येणारा खर्चही तेच करतात.

अनोळखी मृतदेह स्थानिक पोलिस ठाण्याच्या हद्दीत आढळल्यास अकस्मात मृत्यूची नोंद करून पोलिस ठाण्यात फोटो पाठवू त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्या येतो. जवळपासच्या सर्व जिल्ह्यातील पोलिस ठाण्याला फोटो पाठवून त्याची ओळख पटविण्याचे प्रयत्न करण्यात येतात. - पोलिस प्रशास



CS CamScanner



लोकमत इन्फोग्राफिक्स

# दहशत माजवाल तर कोठडीत जाल!

मंगेश कराळे | लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अट्टल गुन्हेगारांना तडीपार करण्याची कारवाई पोलिस करतात. सहा महिने ते दोन वर्षांपर्यंत पोलिस गुन्हेगाराला तडीपार करू शकतात. यानंतर त्या गुन्हेगाराला शहरात, तसेच जिल्ह्यात प्रवेश करण्यास प्रतिबंध घालण्यात येतो. तडीपारीच्या काळात तो प्रतिबंधित क्षेत्रात पुन्हा दिसला तर पुन्हा अटक करून गुन्हा दाखल केला जातो. मीरा-भाईंदर वसई- विरार पोलिस आयुक्तालय झाल्यानंतर तडीपारच्या कारवाईला सुरुवात झाली आहे.

## म्हणून वाढली गुन्हेगारी



- सराईत रेकॉर्डवरच्या गुन्हेगारांवर पोलिस कठोर कारवाई करत असले तरी शहरात नवनवीन गुन्हेगार उजेडात येत आहे.
- दारूची तस्करी, खंडणी, मारहाण, धमकी, खून किंवा खुनाचा प्रयत्न अशा अनेक घटनांमुळे अनेक बेरोजगार युवक गुन्हेगारीत ओढले जातात. अट्टल गुन्हेगारांसोबत मैत्री व ओळख झाल्याने ते सुद्धा गंभीर गुन्हे करतात. नवनवीन गुन्हेगार गुन्हे करत असल्याने गुन्हेगारी वाढली आहे.

वर्षभरात
**१८**
तडीपार

## तडीपार आरोपी तुम्हाला दिसला का?

- शहरातील स्थानिक पोलिस सराईत व मोठ्या गुंडांना मोक्का, एमपीडीए लावून आणि तडीपार करून गुन्हेगारी नियंत्रित करण्याचे प्रयत्न करतात. तरीसुद्धा तडीपार गुंड शहरात आला व तुम्हाला दिसला तर नागरिकांनी पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती द्यावी. माहिती सांगणाऱ्यांचे नाव गुप्त ठेवले जाते.

## तडीपारी कशी होते?

समाजाला घातक गुन्हेगारांची यादी पोलिस ठाण्यातून उपायुक्तांना पाठवली जाते. यादी पडताळणीसाठी सहायक पोलिस आयुक्तांना पाठवतात. त्यानंतर चौकशी करून अंतिम अहवाल पुन्हा पोलिस उपायुक्तांकडे पाठवला जातो. संबंधित व्यक्तीला बाजू मांडण्याची संधी देतात. त्यानंतरच सहपोलिस आयुक्त यांच्या सहीने तडीपारीचा निर्णय घेतात.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्थानिक पोलिस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल असलेल्या आरोपींवर मोक्का, एमपीडीए आणि तडीपाराची कारवाई सुरू आहे. आरोपीला संबंधित पोलिस ठाण्याच्या हद्दीतून, जिल्ह्यातून आणि शहरातून त्याला तडीपार केले जाते.

- पोलिस प्रशासन

CamScanner

2022 में
सई-विरार में
ढ़े शोषण के
मामले
पेज-3

'पठान' की
गल्फ देशों में
दमदार एडवांस
बुकिंग
पेज-6

राष्ट्रीय हिन्दी दैनिक
MHT
मुंबई हिंदमाता टाइम्स
मुंबई, सोमवार 16 जनवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com

| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, माघ कृष्ण पक्ष नवमी | 07.15 am 06.22 pm | | अधिकतम 27°C न्यूनतम 20°C | NSE BSE | Rs 57,885 Per 10 gm |

# मांझा बेचने वालों पर पुलिस की कार्रवाई



**नालासोपारा।** मकर संक्रांति के मौके पर पतंगबाजी का यह शौक इसलिए खतरनाक होता जा रहा है, क्योंकि पतंगबाज चायनीज व नायलॉन मांझा का इस्तेमाल कर रहे हैं और यह मांझा न सिर्फ पतंग बल्कि लोगों की जिंदगी की भी डोर भी काट देता है। इनसे न सिर्फ इंसान ही नहीं बल्कि कई पशु पक्षी भी घायल हो जाते हैं। कोर्ट के प्रतिबंध लगाने के बाद भी रविवार को कई लोग अपने फायदे के लिए खतरनाक मांझा बेच रहे हैं। ऐसे खतरनाक मांझा बेचने वालों पर पुलिस की लगातार कार्रवाई जारी है। शनिवार को तुलिंज पुलिस ने संतोष भुवन इलाके में छापेमारी कर मांझा बेचने वालों से हजारों रुपये का प्रतिबंधित मांझा जब्त किया है, इससे पहले भी तुलिंज पुलिस ने दो लोगों के खिलाफ मामला दर्ज किया था। यह कार्रवाई तुलिंज वरिष्ठ पुलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर के आदेश पर डिटेक्शन टीम ने की है।

CamScanner

लोकमत



तुळिंज पोलिस ठाणे परिसरात फेरीवाल्यांमुळे वाहतूककोंडी होत होती. हे लक्षात घेता तुळिंज पोलिसांनी फेरीवाल्यांवर कारवाई केली.

# तुळिंज पोलिसांनी केली फेरीवाल्यांवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पूर्वेकडील तुळींज पोलिस ठाण्याच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात अनधिकृत फेरीवाल्यांचे बस्तान पाहायला मिळते. त्यामुळे सकाळी, संध्याकाळी या परिसरात खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होते. ही गर्दी आटोक्यात आणण्यासाठी तुळींज पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी शनिवारी सकाळी अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. याआधी या फेरीवाल्यांना येथून हटण्याबाबतच पोलिसांनी समज विनंती केली होती.

पूर्वेकडील तुळींज पोलिस ठाण्याच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. याठिकाणी अनधिकृत फेरीवाले ही मोठी समस्या आहे. फूटपाथ, रस्ते

> पोलिस ठाण्याच्या आजूबाजूला फेरीवाल्यांनी कब्जा केला आहे. वाहनचालकांना आणि रस्त्याने चालणाऱ्या नागरिकांना याचा त्रास होतो. सकाळ संध्याकाळ या फेरीवाल्यांच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात नागरिक खरेदीसाठी गर्दी करतात.
>
> - शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, तुळींज पोलिस ठाणे.

यावर कब्जा करून फेरीवाले बिनधास्तपणे बसतात. यामुळे संध्याकाळी वाहतूक कोंडी होते. पोलिसांनी विनंती करूनही हे फेरीवाले रस्त्यावरून हटत नसल्याने शनिवारी फेरीवाल्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. कारवाई होत असल्याचे पाहताच फेरीवाल्यांनी सामान घेऊन पळ काढला, तर काही फेरीवाल्यांचे सामान जप्त करण्यात आले आहे.



CamScanner

लोकमत

# गिऱ्हाईक बनून आले अन् हातचलाखीने चोरले सोने

## दुकलीला अटक : गुन्हे शाखेची कामगिरी




ज्वेलर्सकडे चोरी केलेल्या गुन्हेगाराला गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विरारच्या ज्वेलर्समध्ये गिऱ्हाईक म्हणून येऊन हातचलाखीने सोन्याचे झुमके चोरून नेणाऱ्या महिलेसह दोन आरोपींना मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांना अटक करण्यात यश मिळाले आहे. अटक आरोपीतील एका आरोपीकडून पोलिसांनी पाच गुन्ह्यांची उकल केली आहे.

विरारच्या फुलपाडा येथील जीवन अपार्टमेंटमध्ये असलेल्या पृथ्वीराज राजपूत यांच्या धर्मराज ज्वेलर्समध्ये गिऱ्हाईक म्हणून येऊन आरोपींनी हातचलाखीने ३ जानेवारीला चोरी करून ७ ग्रॅम २०० मिली वजनाचे सोन्याचे दोन झुमके चोरून नेले होते. याप्रकरणी विरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा करत होती. १२ जानेवारीला घोडबंदर गावातील सिलमेटीक कंपनी येथे सापळा रचून आरोपी राजेश सायबण्णा कुडनूर (३२) आणि अंबरनाथ येथून छाया विनोद चव्हाण (४५) यांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता गुन्ह्यात सहभाग असल्याचे कबूल केले.

गुन्हा करतेवेळी वापरलेली मोटारकार, मोबाइल व रोख रक्कम असे एकूण २ लाख ६ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. आरोपी राजेशवर विरार, तुळींज, माणिकपूर, कासारवडवली आणि अंबरनाथ पोलिस ठाण्यातील गुन्हे दाखल आहेत. येथील पाच गुन्ह्यांची उकल केली आहे.



CamScanner

राष्ट्रीय हिन्दी दैनिक
MHT
# मुंबई हिंदमाता टाइम्स
मुंबई, सोमवार 16 जनवरी 2023
संपादक: विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष-18, अंक 06 | पृष्ठ 8 | मूल्य ₹5/- | संरक्षक: राजन पांडेय / सुमित आचार्य

2022 में सई-विरार में बढ़े शोषण के मामले ...पेज-3

'पठान' की गल्फ देशों में दमदार एडवांस बुकिंग ...पेज-6

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, माघ कृष्ण पक्ष नवमी | 07.15 am / 06.22 pm | मौसम शुष्क रहेगा। दोपहर में तापमान बढ़ेगा। | अधिकतम 27°C / न्यूनतम 20°C | NSE Open 17,956.50 \| Close 17,774.25; BSE Open 60,261.18 \| Close 59,958.03 | Rs 57,885 Per 10 gm; Rs. 72,750 Per Kg |



# अवैध फेरीवालों पर तुलिंज पुलिस की कार्रवाई

**नालासोपारा।** नालासोपारा (पूर्व) में तुलिंज स्टेशन के आसपास बड़ी संख्या में अनधिकृत फेरीवालों ने कब्जा जमाया हुआ था, जिसके चलते लोगों को परेशानी होती थी, जिसे देखते हुए तुलिंज पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर ने अनधिकृत फेरीवालों के खिलाफ कार्रवाई की। फिरवालों के चलते तुलिंज टाकी रोड से लेकर सेंट्रल पार्क तक आसपास नागरिकों की काफी भीड़ रहती है, जिसके चलते शाम के समय जाम लग जाता है। पुलिस कार्रवाई में फेरीवालों का माल जब्त कर लिया गया है। पुलिस ने कहा है कि 50 से 60 फेरीवालों के खिलाफ कार्रवाई की गई है।

**मनपा का काम हमने किया**

" पुलिस स्टेशन के आसपास के इलाके में फेरीवालों ने कब्जा कर लिया है। इससे वाहन चालकों व फुटपाथ पर चलने वालों को परेशानी उठानी पड़ती है। इन फेरीवालों के आसपास बड़ी संख्या में शहरवासी सुबह-शाम खरीदारी के लिए उमड़ते हैं। यह काम महानगरपालिका का है जब उन्होंने कार्रवाई नहीं की तो हमें कार्रवाई करनी पड़ी है।

– शैलेंद्र नगरकर (वरिष्ठ पुलिस निरीक्षक, तुलिंज पुलिस स्टेशन)